**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## स्टार्टअप इंडिया २०१८ कार्यक्रमाचे २० एप्रिलला उद्‌घाटन
## जागतिक किर्तीचे युवा उद्योजक श्री सुहास गोपीनाथ यांची उपस्थिती
## विद्यार्थ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात दि. २० व २१ एप्रिल रोजी स्टार्टअप इंडिया २०१८ इन्नोव्हेटीव्ह प्रदर्शनी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'स्टार्टअप इंडिया २०१८ - इन्नोव्हेट.... स्टार्ट.. सक्सीड' ही थीम यासाठी ठेवण्यात आली आहे. प्रदर्शनीचे उद्‌घाटन बंगळूर, ग्लोबलचे सहसंस्थापक आणि संचालक श्री सुहास गोपीनाथ यांचे शुभहस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून आय.आय.टी. पोवाई, मुंबई कॉम्प्युटर सायन्स आणि इंजिनिअरींगचे प्रो.डॉ.एन.एल. सारडा उपस्थित राहणार असून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर अध्यक्षस्थान भूषविणार असून प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांची प्रमुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

२० एप्रिल रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात स्टार्टअप इंडिया - २०१८ कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार असून त्यानंतरच्या सत्रात श्री सुहास गोपीनाथ आणि प्रो.डॉ.एन.एल. सारडा यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. दु. १.०० वाजता इन्नोव्हेटीव्ह प्रदर्शनीचे उद्‌घाटन विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात संपन्न होईल.

दि. २१ एप्रिल, २०१८ रोजी स. ९.३० वाजता सोमय्या विद्या विहार, मुंबईचे इनोव्हेशन कॅटॅलिस्ट आणि बायोरिल्डीच्या प्रमुख सौ. भावना पंड्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. समारोप कार्यक्रम विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात दु. ४.३० वाजता संपन्न होईल. प्रमुख पाहुणे म्हणून सौ. भावना पंड्या उपस्थित राहतील तर अध्यक्षस्थान विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर भूषवतील.

तरी विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहून प्रदर्शनीचा लाभा घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख, संयोजक प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे आणि आयोजक सचिव डॉ. प्रशांत ठाकरे यांनी केले आहे.

---

## जागतिक किर्तीचे युवा उद्योजक श्री सुहास गोपीनाथ २० एप्रिलला अमरावतीत
## विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी !

औद्योगिक विश्वात सर्वात तरुण नवउद्योजक म्हणून मान्यताप्राप्त श्री सुहास गोपीनाथ २० एप्रिल, २०१८ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात येत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर युरोपीयन संसद, सिंगापूर येथील फेलोशिप, न्युयॉर्क स्थित इकॉनॉमिक डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन कडून अनेक पुरस्कारप्राप्त श्री सुहास गोपीनाथ हे विद्यापीठाद्वारे आयोजित विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प स्पर्धा व स्टार्टअप इंडिया २०१८ या अभिनव उपक्रमाच्या उद्‌घाटनासाठी येत असून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

लीमका बुक ऑफ रेकॉर्डस् राष्ट्रीय स्तरावर भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्राने त्यांच्या कर्तृत्वांचा सन्मान केला आहे. टेक्नॉलॉजी व औद्योगिक क्षेत्रात त्यांची उत्तुंग भरारी युवकांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी श्री सुहास गोपीनाथ यांचेशी संवाद साधण्याची उत्तम संधी या निमित्ताने प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांनी संवाद साधण्याची संधी घ्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १९/०४/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी